सुधारणा व पुनर्वसन

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.-०२०-२६१२४८१५/ २६१२७९०६
ईमेल-igoffice.ddo-mh@ gov.in
Website-www.mahaprisons.gov.in

कारागृह व सुधारसेवा विभाग,
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत,
२ रा मजला, पुणे ४११ ००१

**पहा:-** **१.** शासन निर्णय, वित्त विभाग क्रं.अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२/विनियम दि.०९.११.२०२३.
**२.** शासन निर्णय गृह विभाग क्र.बीयुडी ०६२५/प्र.क्र.७३/आस्था-१ दि.१७.०६.२०२५.
**३.** शासन निर्णय गृह विभाग क्र.बीयुडी ०६२५/प्र.क्र.७३/आस्था-१ दि.१५.०७.२०२५.
**४.** शासन निर्णय गृह विभाग क्र.बीयुडी ०६२५/प्र.क्र.७३/आस्था-१ दि.०३.१०.२०२५.

जा.क्र.लेखा/वाहन अग्रिम/२०२५-२६/कक्ष-५,9970 पुणे ०१, दिनांक:-10 .११.२०२५

## // आदेश //

### विषय:- वाहन अग्रिम मंजूर करणेबाबत वित्तीय वर्ष २०२५-२६

**१.** शासन निर्णय गृह विभाग क्र.बीयुडी ०६२५/प्र.क्र.७३/आस्था-१ दि.१७.०६.२०२५ नुसार वाहन अग्रिम करिता रु.२,१२,०००/- (अक्षरी रक्कम रु.दोन लक्ष बारा हजार फक्त) आणि संदर्भ क्र.०३ नुसार रु.५,३६,८००/- (अक्षरी रक्कम रु.पाच लक्ष छत्तीस हजार आठशे फक्त) एकूण रु.७,४८,८००/- (अक्षरी रक्कम रु.सात लक्ष अठ्ठेचाळीस हजार आठशे फक्त) प्राप्त अनुदाना पैकी रु.१,११,८००/- (अक्षरी रक्कम रु.एक लक्ष अकरा हजार आठशे फक्त) इतके अनुदान शिल्लक आहे. संदर्भ क्र.४ नुसार वाहन अग्रिमाकरिता **रुपये ३६,११,०००/- (अक्षरी रक्कम रु.छत्तीस लक्ष अकरा हजार फक्त)** इतके अनुदान प्राप्त झाले आहे. त्यामुळे दोनही रक्कमा मिळून एकूण **रक्कम रु.३७,२२,८००/- अक्षरी रक्कम रु.सदतीस लक्ष बावीस हजार आठशे फक्त)** इतके अनुदान खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

**२.** मुंबई वित्तीय नियमावली १९५९, नियम १३६ च्या उपनियम (१)(३)(अ)(४)(६)(७) व नियम १३७ आणि वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ नुसार शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र-१०८९/ ५६/विनियम दि.०६.११.१९९० नुसार विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पुणे १ हे खालील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्रमांक ०४ मध्ये नमूद केलेली आगावू रक्कम वाहन खरेदी करण्यासाठी या आदेशातील भाग १ मधील अटींचे व शर्तींचे अधीन राहून एकूण रक्कम **रु.३५,९४,०००/- (अक्षरी रक्कम रु.पस्तीस लक्ष चौ-याण्णव हजार फक्त)** मंजूर करीत आहे.

**३.** वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४९/कोषा प्र-५ दि.२२.०८.२०१४ नुसार कर्जे व अग्रिमे सेवार्थ प्रणालीद्वारे कोषागार कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. त्याकरिता सोबत जोडलेल्या यादीतील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे मंजूर केलेल्या वाहन अग्रिम रक्कमेनुसार शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार सेवार्थ प्रणालीमध्ये माहिती भरुन मुख्यालयास पाठविण्यात यावी, जेणे करुन संगणक प्रणालीतील आदेश तसेच देयके तयार करता येतील.

**४.** सदर माहिती उक्त शासन निर्णय दि.२२.०८.२०१४ अनुक्रमांक ०८ नुसार सेवार्थ प्रणालीमध्ये भरुन संगणक प्रणालीद्वारे वाहन अग्रिम मंजूर करण्यास सक्षम अधिकारी यांचा सेवार्थ आयडी ***IGPSVSF8301/ (SHRUTI BHUSHAN KULKARNI)/ 2201000475*** वर मुख्यालयास सादर करण्यात यावी व भरलेल्या माहितीप्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांची नावे, हफ्त्याची रक्कम, व्याजाची रक्कम व हफ्त्यांची संख्या इ.तपशिलवार माहिती पत्राद्वारे देखील मुख्यालयास कळविण्यात यावी.

५. या आदेशातील रकाना क्रमांक ०५ मध्ये नमूद केल्यानुसार सेवानिवृत्ती नजदीक असलेल्या अधिकारी यांची वाहन अग्रिमाची व्याजासहित वसूली होईल अशा प्रकारे वसूलीचे हफ्ते निश्चित करण्यात यावे.

६. या आदेशातील रकाना क्रमांक ०५ मध्ये नमूद केल्यानुसार अग्रिमाची मुद्दल अग्रिमाच्या व्याजासहित वसूल करताना नवीन मोटार सायकल अग्रिमासाठी व्याजासह जास्तीत जास्त ६० (साठ) हफ्ते, नवीन स्कूटर साठी ४८ (अठ्ठेचाळीस) हफ्ते, नवीन मोपेड साठी ३६ (छत्तीस) हफ्ते यापेक्षा जास्त हफ्ते ठरविण्यात येवू नये.

७. खालील नमूद केलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमाचे देयक **"मकोनि ५७"** या विहित नमुन्यात संबंधीत आहरण संवितरण अधिकारी यांनी "संबंधीत कोषागार " कार्यालयाकडे सादर करावे.

८. आदेशातील अधिकारी/कर्मचारी यांची वाहन अग्रिमाबाबतची माहिती सेवार्थ प्रणालीद्वारे भरावयाची असल्याने जे अधिकारी/कर्मचारी यांची बदली इतर कारागृहात झाली असेल त्यांची नस्ती बदली झालेल्या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावी.

९. आदेशासोबत सर्वसाधारण महत्वाच्या सुचना प्रपत्र अ जोडण्यात आले आहे. त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच सदरील सूचना संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे निर्दशनास आणून द्याव्यात.

**१०. सदरचे अनुदान सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातच खर्च करण्यात यावे व संबंधीतांना रक्कम अदा केल्यानंतर कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक न चूकता मुख्यालयास सादर करण्यात यावा.**

**११. अधिकारी / कर्मचारी यांना वाहन अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांकासह संबंधीतांच्या सेवापुस्तकात न चुकता नोंद घेण्यात यावी. तसेच सेवापुस्तकात व्याजाच्या रक्कमेचीही नोंद घेण्यात यावी.**

**(मा.अ.पो.म.सं.(का.) यांचे मान्यतेने)**

**(सत्यवान म. हिंगमिरे)**
स्वीय सहाय्यक,
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.

**प्रति,**

**कोषागार अधिकारी,**
बीड/लातूर/येरवडा/छ.संभाजीनगर /धाराशिव/यवतमाळ/
नांदेड/कल्याण/पैठण/नंदूरबार/सांगली/ पुणे

**प्रत:- पुढील कार्यवाहीस्तव-**
१. कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, छ.संभाजीनगर
२. अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह:- छत्रपती संभाजीनगर/ येरवडा
३. अधीक्षक, जिल्हा कारागृह-बीड/लातूर/धाराशिव//नांदेड /नंदूरबार/ /यवतमाळ/सांगली /कल्याण
४. अधीक्षक, खुले जिल्हा कारागृह:-पैठण

**प्रत:- माहितीसाठी** - मा. विशेष कारागृह महानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई/ कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे/ पूर्व विभाग, नागपूर

# वाहन अग्रिम मंजूर अधिकारी/ कर्मचारी यांची यादी सन २०२५-२६

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव व कार्यालयाचे नाव | वाहनाचा प्रकार | मंजूर केलेली रक्कम | अग्रिमाचे मुद्दल वसुली हफ्ते व दरमहा वसुली रुपये व व्याजाची परिगणना |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१. | श्री शोएब शेख जाकीर खाटीक, कारागृह शिपाई बीड जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०२. | गजानन भगवान पांडे कारागृह कारागृह शिपाई लातूर जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १५३००० | मुद्दल रु.३१९० X ४७ हफ्ते व ३०७० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२८१३६/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०३. | अब्दुलगनी नजिर शेख कारागृह कारागृह शिपाई येरवडा मध्यवर्ती कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०४. | आबासाहेब जनार्दन मते कारागृह शिपाई छ.संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह | स्कूटर | १४५००० | मुद्दल रु.४०५० X ३५ हफ्ते आणि ३२५० चा एक हफ्ता व्याज रक्कम रु.२०२३०/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०५. | सोमनाथ दत्ता सोनटक्के कारागृह शिपाई लातूर जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०६. | श्रीमती प्रियंका अण्णासाहेब लोहार कारागृह शिपाई धाराशिव जिल्हा कारागृह | स्कूटर | ११२००० | मुद्दल रु.३०९० X ३५ हफ्ते आणि ३८५० चा एक हफ्ता व्याज रक्कम रु.१५४३५/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०७. | श्रीमती शिल्पा जगदीश साहु कारागृह शिपाई यवतमाळ जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०८. | श्रीमती जयश्री जानकीराम जव्हार लिपीक नांदेड जिल्हा कारागृह | स्कूटर | १३१००० | मुद्दल रु.३६३० X ३५ हफ्ते आणि ३९५० चा एक हफ्ता व्याज रक्कम रु.१८१३२- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ०९. | संतोबा सोनबा गुडेवार कारागृह शिपाई नांदेड जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १०. | अरविंद विठ्ठल गायकवाड कारागृह शिपाई नांदेड जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| ११. | विशाल प्रभाकर तांदळे लिपीक कल्याण जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर |

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव व कार्यालयाचे नाव | वाहनाचा प्रकार | मंजूर केलेली रक्कम | अग्रिमाचे मुद्दल वसुली हफ्ते व दरमहा वसुली रुपये व व्याजाची परिगणना |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| | | | | १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १२. | दिपक लिंगप्पा भोसले<br>तुरुंगाधिकारी श्रेणी १<br>पैठण खुले जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १४४००० | मुद्दल रु.३००० X ४८ हफ्ते आणि व्याज रक्कम रु.२६४६०/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १३. | दशरथ रामराव चिंतमवाड<br>कारागृह शिपाई<br>नांदेड जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १४०००० | मुद्दल रु.२९५० X ४७ हफ्ते व १३५० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२६०१९/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १४. | बाबुसिंग जयसिंग चव्हाण<br>कारागृह शिपाई<br>नांदेड जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १४०००० | मुद्दल रु.२९५०X ४७ हफ्ते व १३५० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२६०१९/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १५. | संजु आत्माराम पाटील कारागृह<br>कारागृह शिपाई<br>नंदूरबार जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १४०००० | मुद्दल रु.२९५०X ४७ हफ्ते व १३५० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२६०१९/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १६. | रविंद्र नथु बागुल कारागृह<br>कारागृह शिपाई<br>नंदूरबार जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १४०००० | मुद्दल रु.२९५०X ४७ हफ्ते व १३५० चा ०१ हफ्ता व आणि व्याज रक्कम रु.२६०१९/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १७. | रमेश भिकन दुधे कारागृह<br>कारागृह शिपाई<br>छ.संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह | नवीन मोटारसायकल | १५०००० | मुद्दल रु.३१२५ X ४८ हफ्ते आणि व्याज रक्कम रु.२७५६३/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १८. | अजय अरुण निस्ताने<br>कारागृह शिपाई<br>सांगली जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १०९००० | मुद्दल रु.२२९०X ४७ हफ्ते व १३७० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२०१९८/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| १९. | विकास धोंडबाराव चेंडके<br>कारागृह शिपाई<br>बीड जिल्हा कारागृह | नवीन मोटारसायकल | १४५००० | मुद्दल रु.३०२०X ४७ हफ्ते व ३०६० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२६६३६/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| २०. | नागनाथ संभु जगताप<br>तुरुंगाधिकारी श्रेणी १<br>कारागृह उपमहानिरीक्षक मध्य विभाग छ.संभाजीनगर कार्या. | नवीन मोटारसायकल | १४३००० | मुद्दल रु.२९८० X ४७ हफ्ते व २९४० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२६२८४/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| २१. | राहुल भाऊसाहेब दळे<br>कारागृह शिपाई<br>येरवडा मध्यवर्ती कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| २२. | श्रीमती माया मारोतराव धतुरे<br>तुरुंगाधिकारी श्रेणी १<br>येरवडा मध्यवर्ती कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर |

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव व कार्यालयाचे नाव | वाहनाचा प्रकार | मंजूर केलेली रक्कम | अग्रिमाचे मुद्दल वसुली हफ्ते व दरमहा वसुली रुपये व व्याजाची परिगणना |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| | | | | १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| २३. | विपुल दिनकर पाटील<br>कारागृह शिपाई<br>येरवडा मध्यवर्ती कारागृह | नवीन मोटारसायकल | १६५००० | मुद्दल रु.३४३७ X ४७ हफ्ते व ३४६१ चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.३०३१४/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| २४. | विवेक नरहरराव ढोले<br>वरिष्ठ लिपीक<br>छ संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह | नवीन मोटारसायकल | १५२००० | मुद्दल रु.३१७० X ४७ हफ्ते व ३०१० चा एक हफ्ता आणि व्याज रक्कम रु.२७९५९/- मुद्दल संपल्यावर १२ हफ्त्यामध्ये वसूल करण्यात यावे. |
| (अक्षरी रक्कम रु.पस्तीस लक्ष चौ-याण्णव हजार फक्त) | | | ३५,९४,०००/- | |

Personal Assistant to
Inspector General of Prisons
Maharashtra State, Pune-1.

## प्रपत्र-अ

### -:सर्वसाधारण महत्वाच्या सूचना:-

१. या अग्रिमाकरिता होणारा खर्च ७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे, २०२ वाहन अग्रिम मागणी क्रमांक बी-११ गौणशिर्ष २०२ (७६१०००९६), वित्त विभाग या अर्थसंकल्पात लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये खर्ची टाकण्यात येत आहे.

२. या आदेशातील अधिकारी/कर्मचा-यांच्या अग्रिमाची वसुली रकाना क्रमांक ५ मध्ये दर्शाविल्याप्रमाणे अग्रिम रक्कम ज्या महिन्यात वितरीत केली असेल त्याच्या पुढील महिन्यापासून देय होणाऱ्यावेतनापासून दरमहा करण्यात यावी. अग्रिम वसुलीत खंड पडल्यास दंडनीय व्याज दराने वसुली करावी. अग्रिम वसुलीचा तपशिल अग्रिम वसुली विवरणपत्रामध्ये प्रत्येक महिन्यात कळविण्यात यावा.

३. आदेशातील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा सुरु असल्यास तसेच त्यांना शासकीय सेवेतून निलंबित अथवा कमी करण्यात आले असल्यास त्यांना मंजूर करण्यात आलेली रक्कम प्रदान न करता त्वरीत मुख्यालयाचे निर्देशनास आणावे.

४. ज्या अधिकारी/कर्मचारी यांना वाहन अग्रिम मंजूर झाले आहे अशा अधिकारी/कर्मचारी यांची अग्रिमाची नोंद त्यांचे सेवापुस्तकामध्ये अग्रिम अदा केलेनंतर त्वरीत घेण्यात यावी.

५. या आदेशातील अधिकारी/कर्मचारी यांनी मुंबई वित्तीय नियमावली १९५९ मधील विहित नमुना क्रमांक २० मध्ये करारनामा सादर करावा.

६. वाहन खरेदीचा व्यवहार पूर्ण होताच प्रतिभूती म्हणून क्रमांक २१ मध्ये गहाणबंधपत्र रक्कम काढल्यापासूनच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत या कार्यालयास सादर करावे. खरेदी केलेल्या वाहनाची मूळ किंमत, निर्मात्याचे नांव, वर्णन, सिलींडरची संख्या, इंजिन क्रमांक व चासी क्रमांक वगैरे तपशील विहीत नमुना क्र.२१ मधील विनिदेर्शन अनुसूचीमध्ये उल्लेखिलेल्या प्रमाणे सविस्तर असावा. तसे न केल्यास अग्रिमाची संपूर्ण रक्कम १७ टक्के दंडनीय रक्कम शासनास परत करावी लागेल.

७. वाहन खरेदीचा संपूर्ण तपशील असणारे प्रमाणपत्र वाहनाची प्रत्यक्ष रक्कम अदा केल्याची मुद्रांकित रोख पावती इत्यादी माहिती अग्रिम प्रदान झालेनंतर एक महिन्याचे आंत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालय प्रमुख यांचेकडे सादर करावे. तसे न केल्यास अग्रिमाची संपूर्ण रक्कम दंडनीय दराने व्याजासह एकरकमी वसूल करुन तसे मुख्यालयांस व शासनास कळविण्यात यावे.

८. खरेदी केलेल्या वाहनाची अपेक्षित किंमत ही मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमापेक्षा कमी असेल तर उरलेली रक्कम शासनास त्वरीत परत करावी.

९. वाहन अग्रिम रक्कमेच्या नियमित वसुलीसाठी तसेच मंजूर अग्रिम रक्कमेपेक्षा जादा वसुली होत असल्यास त्यास अर्जदार स्वत:ही जबाबदार राहील.

१०. शासन निर्णय क्रमांक अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२/विनियम दि.०९ नोव्हेंबर २०२३ नुसार मोटारसायकल, स्कूटर, मोपेड खरेदी करण्यासाठी मंजूर केलेल्या अग्रिमा करिता संपूर्ण मंजूर अग्रिम रक्कमेवर व्याजाची परिगणना ९.% या दराने करण्यात आली आहे.

११. ज्या वाहनासाठी अग्रिम मंजूर केले आहे ते वाहन खरेदी करण्यासाठी अग्रिम उपयोगात आणावे. तसे न केल्यास व अग्रिमाचा गैरवापर केल्यास मुंबई वित्तीय नियमावली १९५९ मधील नियम क्रमांक १२४ (ब) तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अग्रिम १०९०/व्याजदर/३६/विनियम दि.४.०९.१९९१ मधील विवरणपत्रक ड अनुक्रमांक ४ अनुसार लागू होणा-या १७ टक्के दंडनीय व्याज दराने संपूर्ण रक्कम एकरकमी वसूल करण्यात येईल.

१२. वाहनाच्या मॉडेलचे नाव, उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व त्या संदर्भाचे नोंदणीचे कागदपत्र सादर करावे लागेल.

१३. वाहन अग्रिम अधिकारी/कर्मचा-यास त्यांच्या सेवा कालावधीत एकदाच देय राहील.

१४. वाहन अग्रिमाचे वसुलीमध्ये कोणत्याही परिस्थितीत खंड होता कामा नये, अन्यथा संबंधीत अधिकारी/कर्मचारी, आहरण व संवितरण अधिकारी व कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल.

१५. मुद्दल व व्याजाच्या रक्कमा निरनिराळ्या चलनाने भराव्यात. मूळ कर्ज किती व कोणत्या तारखेला घेतले व तसेच त्याबाबतचा प्रमाणक क्रमांक, दिनांक व कोषागाराचे नाव आणि कर्ज कोणत्या कारणासाठी दिलेले आहे त्याचाही तपशील चलनावर देण्यात यावा.

१६. अग्रिमाच्या मुद्दलाची वसूली प्रधानशिर्ष ७६१० शासकीय कर्मचा-यांना कर्जे, २०२ मोटार वाहन यांच्या खरेदीसाठी आगावू रक्कमा (७६१०००९६) या शिर्षाखाली व्याजाच्या रक्कम ००४९ (४५) (२) व्याजाच्या रक्कमा या शिर्षाखाली जमा करण्यात याव्यात.

१७. ज्या महिन्यामध्ये संपूर्ण मुद्दलाची परतफेड होईल त्या महिन्यानंतर लगेच येणा-या महिन्यापासून व्याजाची रक्कमेची वसुली तात्काळ सुरु करण्यात यावी. त्याप्रमाणे वसुली न केल्यास अथवा व्याजाच्या वसुलीत खंड पडल्यास शासनाने निर्धारित केलेल्या दंडनिय व्याज दराने व्याजाची आकारणी करण्यात येईल. **वसुल करावयाची रक्कम शिल्लक राहिल्यास ती रक्कम अधिकारी/कर्मचारी यांच्या मृत्यू नि सेवा उपदानातून एक रकमी वसुल करावी. तद्नंतरच ना देय प्रमाणपत्र द्यावे.**

१८. विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत खरेदी केलेल्या वाहनाचा विमा उतरविण्यात यावा व तो अग्रिमाचे संपूर्ण व्याजासह परत फेड होईपर्यंत सतत चालू राहिल याची दक्षता घेण्यात यावी.

१९. अधिकारी/ कर्मचारी यांची सध्याच्या कार्यालयातून बदली झाल्यास अग्रिमाच्या पुढील वसुलीकरिता त्याचा तपशील अंतिम वेतन प्रमाणपत्रावर स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. जेणेकरुन अग्रिमाची वसूली वेळेवर व अचूकरित्या होऊ शकेल. तसेच अग्रिमाच्या वसुलीची माहिती अग्रिम वसुली विवरणपत्रकात पाठविण्याविषयी नवीन कार्यालयास सूचित करण्यात यावे.

२०. अग्रिम घेणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे देय असलेल्या व्याजाच्या रक्कमेची ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालय प्रमुखाकडून तत्परतेने पडताळणी करुन घ्यावी. तसेच ज्या अधिकारी/कर्मचारी यांना अग्रिम मंजूर करण्यात आले आहे अशा अधिकारी/कर्मचारी यांची आदेशात नमूद केलेप्रमाणे मुद्दलाची वसुली केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत देय असलेल्या व्याजाची वसुली लांबणीवर टाकण्यात येवू नये, वसुली त्वरीत सुरु करावी.

**२१. जे अधिकारी/कर्मचारी वाहन अग्रिमावरील मुद्दल व व्याज वसुलीच्या अगोदर सेवानिवृत्त होत असतील अशा अधिकारी/कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीनंतर देय होणा-या लाभांमधून वाहन अग्रिम प्रलंबित रक्कमांची वसुली करण्यात यावी.**

२२. वरील अधिकारी/कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालय प्रमुखांनी अग्रिमाची वसुली दरमहा नियमितपणे अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातून करावी आणि त्याचा हिशोब ठेवावा. अग्रिम रक्कमेवरील व्याजाची वसुली निर्धारित दराप्रमाणे करणे आणि थकबाकीबाबत संबंधीतांना सूचना देणे, **अग्रिम अदा करणेसाठी व अग्रिम अदा केल्यानंतर आवश्यक ती कागदपत्रे विहीत कालावधीत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन दफ्तरी जतन करण्याची जबाबदारी कारागृह अधीक्षक/ कार्यालय प्रमुखांची राहिल याची कृपया नोंद घ्यावी. संबंधीत अर्जदारास अग्रिम मंजूरीच्या वेळी याबाबत आवश्यक सुचना देण्यात याव्यात. अन्यथा सदर प्रकरणी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अग्रीम १०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि.२६ सप्टेंबर १९९७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.**

**(सत्यवान म. हिंगमिरे)**
स्वीय सहाय्यक,
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१